01 FEB 2026

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात संत रविदास महाराज जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रविवारी संत रविदास महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. केदार मारुलकर, डॉ. तेजपाल मोहरेकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 FEB 2026 पुढारी

# पर्यावरण वाचविण्यासाठी नेटाने लढणाऱ्यांना पाठबळ द्या

## रमेश गावस; विद्यापीठात पर्यावरण, प्रसारमाध्यमे विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पर्यावरणाचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असले, तरी देशात पर्यावरणाचे लढे उभे राहताना दिसत नाहीत. अशा लढ्यांसाठी देशातील वातावरण पोषक उरलेले नाही, तरीही काहीजण नेटाने लढत आहेत. त्यांना पाठबळ मिळावे, अशी अपेक्षा गोव्यातील पर्यावरणाचे गाढे अभ्यासक रमेश गावस यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात 'पर्यावरणीय लढे' या विषयावर ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर ढगे, पर्यावरण अभ्यासक शरद आजगेकर, विनायक देसाई उपस्थित होते. गावस म्हणाले, पर्यावरणाचे लढे सापेक्ष आहेत. हे लढे उभारण्यासाठी दीर्घकालीन प्रयत्न करावे लागतील. लढणाऱ्या लोकांना पाठबळ द्यावे लागेल. कायदा व बुद्धिचातुर्यातून लढ्यांची व्यापक आखणी करावी लागेल. पर्यावरण जोपर्यंत आत्मिक जीवनाशी जोडले जाणार नाही, तोवर पर्यावरणाचे लढे यशस्वी होणार नाहीत. दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ पत्रकार ढगे यांनीही मार्गदर्शन केले.



कोल्हापूर : पर्यावरण व प्रसारमाध्यमे या विषयावरील कार्यशाळेचे उद्घाटन रोपला पाणी घालून करताना पर्यावरण अभ्यासक रमेश गावस. डॉ. शिवाजी जाधव, प्रभाकर ढगे, शरद आजगेकर, विनायक देसाई. (छाया : मिलन मकानदार)

मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. तेजश्री शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. जयप्रकाश पाटील यांनी आभार मानले. यावेळी पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. अनमोल कोठाडिया, सुधाकर निर्मळे, डॉ. सुमेधा साळुंखे, शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालयातील शिक्षक, पत्रकार, विद्यार्थी उपस्थित होते.

01 FEB 2026

जनसंपर्क कक्ष

पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ कुलगुरू निवड प्रक्रियेला वेग

## ११५ पात्रताधारकांचे अर्ज; मार्चअखेरपर्यंत निवडीची शक्यता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठीची प्रतीक्षा लवकरच संपणार आहे. राज्यभरातून ११५ पात्रताधारकांनी अर्ज केले आहेत. साधारणपणे मार्च २०२६ मध्ये शिवाजी विद्यापीठाला नवे कुलगुरू मिळण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे शैक्षणिक वर्तुळात ही प्रक्रिया व निवड याविषयी उत्सुकता आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा पाच वर्षांचा कार्यकाल ६ ऑक्टोबर २०२५ रोजी पूर्ण झाला. त्यांचा कार्यकाल संपण्यापूर्वी नूतन कुलगुरूंची निवड होणे अपेक्षित होते. त्यानंतर कुलगुरू निवड समिती तीन सदस्यांपैकी एकाच सदस्याची निवड करण्यात आली. पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा प्रभारी कार्यभार सोपवला आहे. कुलपती कार्यालयाने नूतन कुलगुरूपदासाठी अर्ज मागवले होते. भरतियार विद्यापीठ, कोईम्बतूर येथील प्रा. एस. सरवनन यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती केली आहे. अर्ज प्रक्रियेला दोन दिवसांची मुदतवाढ देण्यात आली.



### निवडीविषयी उत्सुकता

कुलगुरूपद भूषवण्याची संधी कोणाला मिळणार, याची उत्सुकता विद्यापीठ वर्तुळात आहे. कुलगुरूपदासाठी आलेल्या ११५ अर्जांमध्ये सध्या शिवाजी विद्यापीठात कार्यरत असलेल्या, तसेच यापूर्वी विद्यापीठात विविध पदांवर काम केलेल्या अनेकांचा समावेश आहे. त्यामुळे यापैकी कोणाला संधी मिळणार की अन्य कोणाच्या गळ्यात ही माळ पडणार, याची चर्चा सध्या मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

शेवटच्या दिवसापर्यंत ११५ जणांनी अर्ज केले आहेत. यामध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह विद्यापीठातील वाणिज्य विभागाचे डॉ. श्रीकृष्ण महाजन, पत्रकारिता विभागाच्या डॉ. निशा मुडे, रसायनशास्त्र विभागाचे डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. एस. एस. कोळेकर, मुंबईतील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. आर. व्ही. गुरव, माजी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचा समावेश आहे. प्रोफेसरांनी अर्ज केले आहेत.

कुलगुरू शोध समितीकडून प्राप्त अर्जांची छाननी केली जाईल. त्यातून २५ उमेदवारांची नावे शॉर्टलिस्ट होतील. त्यामधील पाच उमेदवारांची नावे कुलपती कार्यालयाकडे सादर होतात. कुलपतींमार्फत त्या पाच जणांची मुलाखत घेतली जाते. या सर्व प्रक्रियेनंतर साधारणपणे मार्च २०२६ मध्ये नवे कुलगुरू मिळण्याची चिन्हे आहेत.

0 1 FEB 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठ कुलगुरुपदासाठी ११५ अर्ज

- प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांसह १६ जणांचा समावेश

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी राज्यभरातून ११५ पात्रताधारकांनी अर्ज केलेत. यात शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र- कुलगुरु डॉ. ज्योती जाधव यांसह १६ जणांचा समावेश आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा पाच वर्षांचा कार्यकाल ६ ऑक्टोबर रोजी पूर्ण झाला. त्यांचा कार्यकाल संपण्यापूर्वी नूतन कुलगुरूची निवड होणे अपेक्षित होते. त्यानंतर कुलगुरू निवड समिती तीन सदस्यांपैकी एकाच सदस्याची निवड केली. पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे प्रभारी कार्यभार सोपवला. कुलपती कार्यालयाने नूतन कुलगुरुपदासाठी २३ डिसेंबर ते २७ जानेवारी या कालावधीत अर्ज मागवले. कोईम्बतूर येथील भरतियार विद्यापीठातील गणित विभागाचे प्रा. एस. सरवनन यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती केली. अर्ज प्रक्रियेला दोन दिवस मुदतवाढ दिली. शेवटच्या दिवसापर्यंत ११५ जणांनी या पदासाठी अर्ज केले. यामध्ये विद्यापीठातील वाणिज्य विभागाचे डॉ. श्रीकृष्ण महाजन, पत्रकारिता विभागाच्या डॉ. निशा मुडे, रसायनशास्त्र विभागाचे डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. एस. एस. कोळेकर, डॉ. एस. व्ही. कोळेकर आदींचा समावेश आहे. अर्जांची लवकरच छाननी करुन फेब्रुवारीमध्ये निवड समितीकडून मुलाखतीची प्रक्रिया पार पडेल.

0 1 FEB 2026

लोकमत

# पर्यावरणासाठी लढणाऱ्यांना पाठबळ द्या : रमेश गावस

## पर्यावरण आणि प्रसारमाध्यमे विषयावर कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : पर्यावरणाचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असले तरी देशात पर्यावरणाचे लढे उभे राहताना दिसत नाही. अशा लढ्यांसाठी काहीजण नेटाने लढत आहेत. त्यांना पाठबळ मिळावे, असे आवाहन गोव्यातील पर्यावरणाचे गाढे अभ्यासक रमेश गावस यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात पर्यावरणीय लढे या विषयावर ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर ढगे, पर्यावरण अभ्यासक शरद आजगेकर, विनायक देसाई उपस्थित होते. ढगे म्हणाले, देशात अनेक स्मार्ट सिटी होत आहेत, परंतु त्या स्मार्ट करण्याच्या नादात पर्यावरणाचा बळी दिला जात आहे. हिमालयाचा ऱ्हास होत आहे. नद्या आणि समुद्राचे प्रदूषण वाढत आहे. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. तेजश्री शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. जयप्रकाश पाटील यांनी आभार मानले. यावेळी पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. अनमोल कोठाडिया, सुधाकर निर्मळे, डॉ. सुमेधा साळुंखे उपस्थित होते.

0 1 FEB 2026 **पुढारी**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाकडून ६४९ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाकडून ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ६४९ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयांत सध्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. शनिवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजीसह १३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत झाल्या. परीक्षेला ८६१ विद्यार्थी उपस्थित होते. दि. ३१ रोजी डीआयटी (कॉमर्स), एमए (अर्थशास्त्र), फाईव्ह इयर इन लॉ, एलएलएम, पीजीडीसीए आदी १८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.